११ ~~सगेसोयरेच आले~~. ५ ~~दिंडी~~ — १३५२

सगेसोयरेच आले

दिंडी निघाली निघाली
पंढरीच्या वाटेवरी
दुःख पाणीसवे वाहोनी
सुख सुके ते बोलके

ज्ञानामृत ज्ञानदेवे
मुखाशी वारकरी
तुकोबाच्या अभंगात
दंग झाले वारकरी

किती तिष्ठली ही काया
उभ्या विठुराया साठी
रात्र चिपळ्यात गेली
विसरुन माया खोटी

गंध केशरीच भाळी
आणि कस्तुरी पताका
ब्रह्मरूप अद्वैताचा
देह अखंडित झाला

युगे युगे ओढ अशी
भव-पाश गुंतलेले
विठुराया सारे तुझे
सगेसोयरेच आले.

२५।१।७७ सहदेव गायकवाड